# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.०३/का-५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- २५ नोव्हेंबर, २०२५.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५
मतदार यादीबाबत.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि. १६ जुलै, २०२५ व दि. २९ ऑक्टोबर, २०२५

महोदय,

मतदार यादीबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारी विचारात घेता मतदार यादीच्या अनुषंगाने खालील बाबी कराव्यात.

१. मतदारांकरीता नाव शोधण्याची (Voters Search) सुविधा :-

राज्य निवडणूक आयोगाच्या https://mahasecvoterlist.in/ वेबसाईटवर Search name in voters list या टॅबमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव शोधण्याची सुविधा देण्यात आली आहे. सर्व महानगरपालिकांना त्यांच्या वेबसाईटवर सदर सुविधेची लिंक उपलब्ध करुन मतदारांच्या सोयीकरीता देता येईल. जेणेकरुन महानगरपालिकेच्या मतदारांना प्रारुप मतदार यादीत आपले नाव योग्य प्रभागात आले आहे किंवा कसे हे तपासणे सोपे होईल.

२. दुबार मतदारांबाबत कार्यवाही मतदान केंद्रनिहाय मतदार यादी करण्यापूर्वी पूर्ण करणे :-

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन दि. २९ ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशान्वये संभाव्य दुबार मतदारांबाबत कोणती कार्यवाही करावी. याबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत. त्यानुसार मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करताना त्यावर दुबार नावांची नोंद होणे आवश्यक

आहे. त्यामुळे दुबार मतदारांबाबत विहित केलेली कार्यवाही मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करण्यापूर्वी निश्चितपणे पूर्ण करावी.

३. मतदार सहाय्यता केंद्र (Help Desk) :-

महानगरपालिकांनी मतदारांना त्यांचे मतदार यादीतील नाव शोधणे सोयीस्कर व्हावे या दृष्टीने महानगरपालिका मुख्यालय अथवा प्रभाग कार्यालयांमध्ये मतदार सहाय्यता केंद्र (Help Desk) सुरू करावे. जेणेकरुन जे नागरिक वेबसाईट अथवा अन्य मार्गाने त्यांचे मतदार यादीतील नाव शोधू शकत नसतील त्यांना आपले नाव शोधणे शक्य होईल. तसेच या ठिकाणी दुबार मतदारांची यादी उपलब्ध ठेवून, दुबार मतदाराना देखील अर्ज भरुन देण्याची सोय ठेवावी.

मतदार यादी विभाजनाची कार्यवाही अचूक होण्याकरीता तसेच त्यामध्ये पारदर्शकता येऊन अधिकाधिक मतदारांना आपले नाव शोधण्याची संधी उपलब्ध करुन देण्याकरीता वरील उपाययोजनांचा महानगरपालिकांनी तात्काळ अवलंब करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(सुरेश काकाणी) २५.११.२०१७

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र